**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**पाहिजे**

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सिव्हील, इलेक्ट्रिक व प्लंबिग कामासाठी 'आर्किटेक्ट' नियुक्त करावयाचा आहे. त्यासाठी पात्र व्यक्तीकडून दि.२२/०४/२०१८ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. नियुक्तीच्या अटी व शर्ती www.vitthalrukminimandir.org या संकेत स्थळावर व तुकाराम भवन, पंढरपूर येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

क्र.बांधकाम/का.वि./०१/२०१८ दि. १४/०४/२०१८

स्वा/–
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र.: ०२१८६–२२४४६६)

## श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## अटी व शर्ती (जाहिरात दि.१५/०४/२०१८).

१. अर्जदाराचे वय कमाल ६५ वर्षे असावे. जन्मतारखेचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२. पात्रता.

- शैक्षणिक पात्रता किमान बी. ई. आर्किटेक्ट असावी.
- शासकीय व निमशासकीय प्रकल्पांमध्ये कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचा अनुभव असावा.
- सदर प्रकल्पातील कामाचा खर्च हा कमीत कमी ३.५ कोटी असावा.
- पुरातत्व खात्याकडे व देवस्थानमध्ये कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३. सदर पदावरील पात्र उमेदवाराची निवड तज्ञ अधिकारी व मंदिर समिती पदाधिकारी यांचेकडून मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

४. उमेदवारास मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

५. अर्जासोबत आपल्या नावे कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

६. सदरची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यानी कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

७. कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून, संबंधितांकडून योग्य अटी व शर्तीचे बंधपत्र घेवून, त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

८. सदर नियुक्तीद्वारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

९. प्रस्तावामध्ये आपले मानधनाविषयी नमुद करावे.

१०. काम मध्येच सोडावयाचे असल्यास तशी तीन महिने अगोदर नोटीस देणे आवश्यक राहील. अचानक काम सोडता येणार नाही.

११. कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ कामावरुन कमी करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.

१२. श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरात आपल्या कुटुंबातील व्यक्ती कामाला असल्यास अर्ज करता येणार नाही.

१३. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकारी मंदिर समितीने राखून ठेवला आहे.

१४. निवड झाल्यास नेमणुकीच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.१००/— च्या स्टॅप पेपरवर तहसीलदार यांचे समोर सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१५. **<u>कामकाजाचे स्वरूप :—</u>**

- सिव्हील, ईलेक्ट्रिक व प्लंबिग कामाचे नकाशे तयार करणे.
- सिव्हील, ईलेक्ट्रिक व प्लंबिग कामाच्या सद्यस्थितिचा अभ्यास करून व नविन सुधारीत आराखडा तयार करणे.
- सिव्हील, ईलेक्ट्रिक व प्लंबिग कामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे.
- सिव्हील, ईलेक्ट्रिक व प्लंबिग कामाच्या निविदा तयार करणे व निविदा प्रक्रियेत मदत करणे.
- सिव्हील, ईलेक्ट्रिक व प्लंबिग कामाच्या अंदाजपत्रकास त्रिऱ्हाईत शासकीय एजन्सीकडून तांत्रिक मान्यता घेणे. त्यासाठीची लागणारी कागदपत्रे मंदिर समितीकडून प्राप्त करून घेणे, ती तयार करण्यास मदत करणे.
- सिव्हील, ईलेक्ट्रिक व प्लंबिग कामांची पाहणी व तपासणी करणे.
- मंदिर समितीमार्फत वेळोवेळी सोपविण्यात येणारी सदर कामांविषयक जबाबदारी पार पाडणे.
- मंदिराच्या कामाबाबत पुरातत्व खात्याशी पत्रव्यवहाराविषयी कामकाज करून आवश्यक ती कार्यवाही करणे.

——————XXX——————